## थोडक्यात

### योगेशजी कुंभेजकर चौसळा येथिल शेतकऱ्यानं भेट



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील महाबीज बिजोत्पादन प्रक्षेत्राची पाहणी केली, यावेळी चौसाळा, हिंगणी बुद्रुक येथील बिजोत्पादक शेतकरी यांच्या बिजोत्पादन प्रक्षेत्रावर भेटी देऊन व बियाणे उत्पादक शेतकरी यांच्याशी बिजोत्पादन बाबत संवाद साधला. तसेच शिदोड तालुका बीड येथील, कृषी विभागाच्या तालुका बीज गुणन केंद्राच्या प्रक्षेत्रावर कांदा, तूर, हरभरा, गहु, व ज्वारी बिजोत्पादन क्षेत्राची पाहणी केली, यावेळी बीड उपविभागाचे उपविभागीय कृषी अधिकारी, श्री. उद्धवजी गर्जे, ता. बी. के. प्रभारी परेशजी शिंदे उपस्थित होते. त्याबरोबरच बीड येथील महाबीज, विक्रेते व विक्रेते प्रतिनिधी यांच्याशी देखील आदरणीय सरांनी संवाद साधला.

### 'दिलखुलास', कार्यक्रमात दंत शल्यचिकित्सक डॉ. अर्चना पवार यांची मुलाखत



**मुंबई । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात 'मौखिक आरोग्य आणि खबरदारी' या विषयावर ठाणे जिल्हा, शासकीय रूग्णालयाच्या, दंत शल्यचिकित्सक डॉ. अर्चना पवार यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. जगभरात मौखिक आरोग्याच्या दृष्टीने विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात. मौखिक आरोग्याचा मनुष्याच्या सामान्य आरोग्याशी घनिष्ठ संबंध असून दातांची कीड, हिरड्याचे आजार, मुखदुर्गंधी, तंबाखूमुळे होणारे मुखाचे आजारांचा प्रामुख्याने मौखिक आरोग्यात याचा समावेश होतो. वाढत्या वयानुसार होणाऱ्या आजारांचा आणि औषधांचाही ज्येष्ठांच्या मौखिक आरोग्यावर परिणाम होतो. त्याअनुषंगाने मौखिक आजाराचे प्रकार आणि या आजारांबाबत काय काळजी घेणे आवश्यक आहे, याबाबत 'दिलखुलास' कार्यक्रमातून डॉ. अर्चना पवार यांनी माहिती दिली आहे. 'दिलखुलास' कार्यक्रमात डॉ. पवार यांची मुलाखत शुक्रवार दि. २७, शनिवार दि. २८, सोम वार दि.३० आणि मंगळवार दि.३१ डिसेंबर २०२४ तसेच बुधवार दि. १ जानेवारी २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल पवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे, निवेदक सुचिता गरूडे यांनी ही मुलाखत घेतली आहे.

# रस्त्यासाठी दिले रस्त्यावरचं निवेदन

## खासदार रवींद्र चव्हाण यांना निवेदन देऊन मागणी

**गावची नावे: बल्लूर फाटा ते बल्लूर – गवंडगांव, शिवणी पेंडपल्ली – झरी, माळेगांव (डावीकडे क्षीरसमुद्र – हाळी, बेंबरा तांडा) – मरतोळी, अंबूलगा, भूतनहिप्परगा, सोमुर – बेंबरा, मानूर, गो.गो तांडा**



**देगलूर । प्रतिनिधी**

कै. वसंतरावजी चव्हाण यांनी मानूर येथील जाहीर सभेत निवडून आल्यानंतर प्रथम प्राधान्य या रस्ताचा कामासाठी असेल असे जाहीरपणे जनतेस विश्वास दिले होते परंतू दुर्दैवाने ते आपल्यात नसून खासदार रवींद्र चव्हाण यांना त्याच्या शब्दाची आठवण करून देतं,त्यांनी दिलेल्या विश्वासास तडा न जाऊ देता या रस्ताच्या कामात प्रत्यक्ष स्वत लक्ष देऊन जलद गतीने मंजुरी आणून नवीन करून या सिमाभागास न्याय द्यावे अशी मागणी निवेदन देऊन करण्यात आली.

तसेच बल्लूर ते मानूर हा रस्ता दुरुस्ती कामे प्रस्तावित व मंजूर कालवधीत होणे संबधित विभागाची जबाबदारी असताना तसेच कार्य झाले नाहीत यामुळे विषयी नमूद रस्ताची दुरवस्था पाहताक्षणी संबधित विभाग लोकप्रतिनिधी व कंत्राटदार यांची कितीची भागीदारी असेल असे प्रश्न सर्व सामान्य जनतेचा मनात रेंगाळत आहेत. हा रस्ता दुरुस्तीच्या नावे स्थानिक लोकप्रतिनिधी व कंत्राटदार यांनी संबधित विभागास हातासी धरून संयुक्तपणे मलेदा लाटण्या पलीकडे इथे कामे दिसून येत नसून, आपण हा सीमावृत्ती भाग व रस्तालगतच्या सर्व गांवकऱ्यांनी विश्वास घेऊन सदरील रस्ताचे सक्षम काम जलद गतीने करून सार्थ करावे असे मत उपस्थित नागरिकांनी मांडले. यावेळी मा. नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार,बालाजी पाटील बेटम ेगेरेकर, निवृत्ती कांबळे,नितेश पाटील,बालाजी थडके यांच्या उपस्थितीत अँड.अंकुशरा जे जाधव, विशाल पवार, शिवकुमार बिरादार, सचिन पाटील, वैभव पाटील, श्रीराम पाटील, विष्णू रेड्डी, दीपक रेड्डी, राहुल फिरंगे, राजू वाघमारे, राजू वाघमारे आदी च्या स्वक्षारीने निवेदन खासदार रवींद्र चव्हाण यांना देऊन मागणी करण्यात आले.

**बल्लूर फाटा ते मानूर हा भाग सीमावृत्ती असून गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता खराब असल्याने या रस्त्यावर अनेकांना स्वतःचे जीव हि गमवावे लागलं आहे. एवढेच नसून या भागातून शाळा, महाविद्यालय आदी साठी विध्यार्थी, नागरिक ये जा करतात परंतु रस्त्यामुळे या भागात महामंडळ ची सुविधा वेळेवर नाही त्यामुळे विध्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होतं आहे.आम्ही सिमावृत्ती भागात राहतो म्हणून आमच्या कडे कोणी लक्ष देतं नाही का ? असा सवाल विशाल पवार यांनी केले. – विशाल पवार, रहिवाशी सीमावृत्ती भाग, देगलूर**

### संगीत माणसाला जोडण्याचे काम करते - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## राज्यपालांच्या हस्ते 'मोहम्मद रफी' पुरस्काराचे वितरण



**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मंगळवारी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात आयोजित कार्यक्रमात १९ व्या 'मोहम्मद रफी' पुरस्काराचे वितरण करण्यात आले. 'स्पंदन आर्ट' संस्थेतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संगीत ही कला जात, धर्म, पंथ, भाषा या पलिकडे जाऊन माणसाला जोडण्याचे काम करते, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी यावेळी केले.

चित्रपट सृष्टीमधील आघाडीच्या व सर्वात लोकप्रिय गीतकारांपैकी एक असलेल्या मजरुह सुलतानपुरी यांना या वर्षीचा 'मोहम्मद रफी जीवनगौरव पुरस्कार' (मरणोत्तर) तसेच हिंदीसह बंगाली, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, तामिळ, तेलगू, उर्दू अशा विविध प्रादेशिक भाषांमध्ये पार्श्वगायन करणाऱ्या जावेद अली यांना 'म ोहम्मद रफी पुरस्कार २०२४' ने राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

मजरुह सुलतानपुरी यांचा जीवनगौरव पुरस्कार त्यांचे पुत्र अंदलिब मजरुह सुलतानपुरी यांनी स्वीकारला. एक लाख रुपये व स्मृतीचिन्ह असे जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप असून, ५१ हजार रुपये व स्मृतीचिन्ह असे 'मोहम्मद रफी पुरस्कारा'चे स्वरूप आहे. या कार्यक्रमाला माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, ॲड. प्रतिमा शेलार तसेच मोहम्मद रफी, मजरुह सुलतान पुरी व जावेद अली यांचे कुटुंबीय व संगीत प्रेमी उपस्थित होते.

यावेळी 'फिर रफी' या बहारदार मैफिलीत प्रसिद्ध गायक श्रीकांत नारायण यांनी मोहम्मह रफी यांची अजरामर गाणी सादर केली.

## स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याच्या अटकेच्या मागणीसाठी निघणारा मोर्चा बहुसंख्येने शामिल व्हावे: अखिल भारतीय मराठा महासंघ

**बीड । प्रतिनिधी**

केस तालुक्यातील मसाजोग गावचे लोकप्रिय सरपंच स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांची काही समाजकंटक जातंध आरोपींनी निर्गुण पणे हत्या केली या आरोपीच्या अटकेच्या मागणीसाठी बीड शहरात दिनांक २८ डिसेंबर रोजी सर्वपक्षीय सर्व धर्मीय सर्व संघटना यांच्या वतीने भव्य असा विराट मोर्चा निघणार आहे तसेच हा मोर्चा या आरोपींना अटक करून फास्टट्रॅक कोर्टामार्फत केस चालवून त्यांना फाशीच्या शिक्षा पर्यंत पोहोचण्यासाठी निघणार आहे त्यासाठी समाजातील सर्व घटकांनी ग्रामीण शहरी शेतकरी शेतमजूर अधिकारी कर्मचारी शिक्षक पोलीस समाजातील सर्व स्तरातील घटकांनी या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन मराठा महासंघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके जिल्हा उपाध्यक्ष रवी डोंगरे जिल्हा विद्यार्थी जिल्हाध्यक्ष भागवत मस्के दुसरे जिल्हा उपाध्यक्ष सुमंत खांडे यांच्यावतीने शहर अध्यक्ष दत्ता शेळके एका पत्रकाद्वारे करण्यात आले आहे तसेच या मोर्चासाठी मराठा महासंघाचे मराठवाड्यातील सर्व पदाधिकारी जिल्हा अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत असे निवेदन पत्रकाद्वारे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके यांनी दिले आहे

# मौज येथे सामाजिक सभागृहाचे भुमीपुजन

## तालुक्यासाठी निधी कमी पडू देणार नाही : किशनराव तांगडे



**ढेकनमोहा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौज येथे २५.डिसेबर रोजी सामाजिक न्याय राज्यमंत्री संघर्ष नायक लोकनेते मा. ना. रामदासजी आठवले साहेब यांच्या वाढदिवस व म नुस्मृती दहन व रत्री मुक्ती दिनाचे औचित्य साधून २५ डिसेंबर रोजी मौज ता जी बीड येथे लोकनेते मा ना रामदास आठवले साहेब यांच्या खासदार फंडातून १० लक्ष रुपये निधीचे भव्य दिव्य सभागृहाचे बौद्ध विहार पाया भरणी चा शुभारंभ सोहळ्याचे उद्घाटन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे बीड तालुका अध्यक्ष किशनराव तांगडे यांच्या हस्ते संपन्न झाले या वेळी प्रमुख उपस्थिती म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या बीड जिल्हा प्रमुख मायाताई मिसळे, युवक रिपाइंचे बीड तालुका अध्यक्ष सुभाषराव तांगडे, ढेकणमोहा माजी सरपंच नागेश शिंदे, जरुडचे राहुल कोरडे, आनंद विदयगर बाबुराव भालेराव, शरद डावकर, अमित सवाई सर, आपाराव मिसळे, खळगे रामेश्वर यांच्या उपस्थितीत पार पडले या कार्यक्रमात आश्रुबा मिसळे, गोरख मिसळे, शिवाजी मिसळे, अनिल मिसळे, शहाजी मिसळे, आकाश थोरात, सुरेशं मिसळे, महीला शाखाप्रमुख रेखा सिसळे, ज्योती ढोबळे, कांती मिसळे, कुसुम मिसळे, सुमीत्रा मिसळे, शोभा मिसळे, कवीता मिसळे, कालीदा मिसळे, मिना मिसळे, संगीता मिसळे, , लताबाई मिसळे, अर्चना वडमारे अमोल मिसळे, निखिल मिसळे, लाला मिसळे, राजु बाई हे मिसळे या सह सर्व बौद्ध उपासक उपासीका यांच्या सह मोठ्या संख्येने उपस्थित होते तर आभार प्रदर्शन प्रा. अमित सवाई सर यांनी केले.

महाराष्ट्र शासन

वनविभाग

### वन्यजीव विभाग छत्रपती संभाजीनगर

### वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगावं

### निविदा सुचना (व्दितीय वेळ)

जा.क्र./वपअ./योजना/261/2024-25, दिनांक:-26/12/2024

वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव अंतर्गत असलेल्या नियतक्षेत्रातील खालील कामाकरीता मोहरबंद खुल्या पध्दतीने व्दितीय वेळ निविदा (बी-1) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | पिंपळगाव धस कं.नं. 363B घनवन रोपवन (PMW) क्षेत्र 0.5 हे. | 878749 | 8787 | 100 |
| 2 | डोंगरकिन्ही कं.नं. 360B घनवन रोपवन (PMW) क्षेत्र 0.5 हे. | 878749 | 8787 | 100 |
| 3 | डोमरी कं.नं. 371B घनवन रोपवन (PMW) क्षेत्र 0.5 हे. | 878749 | 8787 | 100 |
| 4 | निरगुडी कं.नं. 369A घनवन रोपवन (PMW) क्षेत्र 0.5 हे. | 878749 | 8787 | 100 |
| 5 | नाळवंडी गुरे प्रतीबंधक चर खोदणे (TCM) कं.नं.361, क्षेत्र 15 हे. | 464373 | 4644 | 100 |
| 6 | नायगाव गुरे प्रतीबंधक चर खोदणे (TCM) स.नं.69, क्षेत्र 15 हे. | 464373 | 4644 | 100 |
| 7 | डोमरी कं.नं.371A गॅबीयन बंधारे बांधणे | 814283 | 8143 | 100 |
| 8 | डोमरी कं.नं.371B गॅबीयन बंधारे बांधणे | 814283 | 8143 | 100 |
| 9 | खडकवाडी कं.नं.369A गॅबीयन बंधारे बांधणे | 780500 | 7805 | 100 |
| 10 | पिंपळगाव धस कं.नं.363 गॅबीयन बंधारे बांधणे | 797391 | 7974 | 100 |
| 11 | पिंपळगाव धस कं.नं.362 A गॅबीयन बंधारे बांधणे | 797391 | 7974 | 100 |
| 12 | डोमरी कं.नं.371 B सलग समपातळी चर खोदणे (CCT) क्षेत्र 8 हे. | 502406 | 5024 | 100 |

**अटी व शर्ती-**

1. आवश्यक त्या विभागाचा नोंदणीकृत ठेकेदार निविदा भरण्यास पात्र असेल.
2. अ) कोऱ्या निविदा विक्री दिनांक 27/12/2024 सकाळी 10:00 वाजेपासुन ते दिनांक 02/01/2025 रोजी संध्याकाळी 05:00 वाजेपर्यत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव कार्यालयात उपलब्ध होतील.
   ब) मोहरबंद निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक 02/01/2025 रोजी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत.
   क) निविदा उघडण्याचा दिनांक 03/01/2025 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोयीनुसार.
3. निविदा पोटी इसारा रक्कम लेखा विभागात रोखीने भरुन पावतीची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्र. 01 च्या आत ठेवुन व या लिफाफावर अनामत पावतीचा तपशिल लिहून लिफाफा क्र. 01 व लिफाफा क्र. 02 निविदा सीलबंद करुन वनपरिक्षेत्र (वन्यजीव) कार्यालयात दाखल करावेत.
4. इसारा रक्कमेचा डी. डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेड्युल बॅंकेचा विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) छत्रपती संभाजीनगर यांचे नावाने सादर करावा.
5. सदर कामाचा कालावधी हा चालु 2024-25 या वर्षाचा असुन सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहील.
6. या जाहिरातीबाबत अधिक माहिती वनपरिक्षेत्र (वन्यजीव) नायगांव यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे. व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7. प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार वन्यजीव वनविभाग छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
वनपरिक्षेत्र अधिकारी,
(वन्यजीव) नायगांव.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १७७७/२०२४**
**ॲड. एस. एस. महाजन यांच्या मार्फत**
**उर्मिला माने विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) उर्मिला शरद माने, वय ३० वर्ष, धंदा घरकाम, पत्ता – बापदेव वस्ती, ता.खेड जि.पुणे

विरुध्द

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कल्याण रामनी तोडेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **कल्याण रामजी तोडेकर** यांचा मृत्यु दि. १९/०३/२०२४ रोजी मौजे युनिकअर हॉस्पीटल, नानीकरवाडी, ता. खेड जि. पुणे येथे झाला आहे. अर्जदार ही मयताची सख्खी विवाहीत बहीण आहे. मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत हे मृत्युसमयी अविवाहीत होते.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत कल्याण रामजी तोडेकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६ माहे डिसेंबर २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८ जानेवारी २०२५.

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक — अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**

**श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९५५/२०२४**
**शारदाबाई व ईतर विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. आर. डी. भांबरे गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सुभाष गुणाजी शिंदे हे दिनांक १०/०९/२०१० रोजी मौजे लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्रं. १. शारदाबाई भ्र. सुभाष शिंदे वय ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड अर्जदार क्रं. २. महेश पि. सुभाष शिंदे वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मयत नामे सुभाष गुणाजी शिंदे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/१२/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २४/०१/२०२५

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक — सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

# मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तींकरीता

## कायदेशीर प्रशिक्षण शिबीरामध्ये मान्यवरांचे माहितिपुर्ण मार्गदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

मानसिक आजारी व बौध्दिक व दिव्यांग व्यक्तींकरीता कायदेशीर प्रशिक्षण दोन दिवसीय शिबीर जिल्हा न्यायालयात झाले असून यात मान्यवरांचे माहिती पुर्ण मार्गदर्शन लाभले.




सदर कार्यक्रमाचे उद्घाटक आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांनी केले. सदर कार्यक्रमास डॉ. मुजाहिद मोहम्मद जिल्हा शासकीय रूग्णालय बीड, जी.जी. सोनी सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ॲड.पि.व्ही. दगडखैर मुख्य विधी सहायक संरक्षक लोकअभिरक्षक कार्यालय बीड, अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड, ॲड.ए.एस.कदम विधीसहाय संरक्षक, अधिकार मित्र तत्वशिल कांबळे, मिथुन जोगदंड, महेश कानपाठक, किरण नन्नवरे हे उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण मुंबई, यांच्या सुचनेनुसार जिल्हयामध्ये मुलासांठी कायदेशीर मदत सेवा केंद्र प्रशिक्षण शिबीराचे आयोजन हे जिल्हा न्यायालयात दि. २३.१२.२०२४ व २४.१२.२०२४ या दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव मा.जी.जी.सोनी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले मनोन्याय या समितीबद्दल सविस्तर मार्गदर्शन करताना म्हणाले की, मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तीकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्यावतीने मनोन्याय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीमूळे मानसिक आजारी व बौध्दिक दिव्यांग व्यक्तींना न्याय मिळवणे सोपे जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. ॲड. पि.व्ही.दगडखैर यांनी मानसिक आरोग्याकरीता कायदेशीर सूविधा याबाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. ॲड. अमित कदम हे मार्गदर्शन करताना म्हणाले की,मानसिक आजार असलेल्या व्यक्तीचे हक्क आणि बौध्दिक दृष्टया कमकुवत असलेल्या व्यक्ती करीता कायदेशीर मदत यावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. मुजाहिद मोहम्मद यांनी तज्ञ म्हणुन मार्गदर्शन करताना म्हणाले की, सध्याची तानतनावाची परिस्थिती व धावपळीचे जीवन यामध्ये मानसिक आजारी रूग्णांची संख्या वाढत असुन त्यावर तात्काळ उपचावर घेणे हे गरजेचे आहे. मानसिक आजार लपविल्यामूळे वाढतो. जर आपण वेळेवर उपचार घेतला तर, आपणास फायद्याचे ठरते. जिल्हा शासकीय रूग्णालय बीड येथे मानसिक रूग्ण यांचे उपचार केले जातात.तत्वशील कांबळे यांनी मार्गदर्शन करत सांगितले, बालकांचे मानसिक आरोग्य जपणे खुप गरजेचे आहे.

मदतीसाठी टोल फ्री नंबर १५१०० कायदेशीर मदतीसाठी टोल फ्री नंबर सागितला टेलि मानस चे टोल फ्री क्रमांक १४४१६ ची माहिती दिली.

# शिवसेनेकडून अनिल दादा जगताप यांना विधान परिषदेत संधी द्यावी : गणेश काळे

**बीड । प्रतिनिधी**



गेल्या ४ दशकांपासून सामाजिक सेवेत अन् राजकीय परिघात असलेले अनिल दादा जगताप हे कडवट शिवसैनिक म्हणून ओळखले जातात. अनिल दादांनी शिवसेनेसाठी आपले आयुष्य वेचलेले आहे. सर्वसामान्यांच्या सुखदुः खात प्रामाणिकपणे अनिल दादा सेवेत असतात अशा नेतृत्वास न्याय देत शिवसेना पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी विधान परिषदेत संधी द्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते गणेश काळे यांनी केले आहे. जिल्हाभरात शिवसेना वाढीसाठी अनिल दादांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे. गावोगाव शिवसैनिक उभे करत पक्ष वाढ करण्याचं काम अनिल दादा ४० वर्षांपासून करत आहेत. या नेतृत्वाचा विधिमंडळात समावेश केल्यास नक्कीच सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लागतील. पक्षप्रमुख शिंदे साहेबांचा विचार अनिल दादा तळागाळापर्यंत घेऊन जाऊ शकतात. शिवसैनिकांना मराठवाडाभरात हक्काचे व्यासपीठ दादांच्या माध्यमातून उपलब्ध होईल. शेतकरी ,कष्टकरी बांधकाम कामगार , महिला, विद्यार्थी यांना वेळोवेळी सहकार्य केल्यामुळे सर्वसामान्यांच्या तोंडावरून बीड जिल्ह्याची शिवसेना म्हटलं की, लगेच फक्त आणि फक्त अनिल दादा जगताप यांचे नाव समोर येतं. सर्व समावेशक असं नेतृत्व म्हणून अनिलदादांना संबोधले जाते. यामुळे दादांना विधानपरिषद सदस्यपदी नियुक्ती द्यावी असे आवाहन जिल्ह्यातील शिवसैनिक करत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते गणेश काळे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे म्हंटले आहे.




*अखिल भारतीय मराठा महासंघ आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान यांच्याकडून मराठा सेवक श्री.संतोष दादा डावकर यांचा काल दि.२६/१२/२०२४ गुरूवार रोजी आळंदी येथे मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. ( छाया- संभाजी लांडे पाटील )*

# अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड वीर बाल दिन साजरा



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे वीर बाल दिन साजरा करण्यात आला. सुधीरकुमार ढाकणे बाल विकास प्रकल्प अधिकारी,मन्सुरी अन्सार निसार अहमद जि.अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड ,अशोक तांगडे अध्यक्ष बाल कल्याण समिती ,संतोष वारे बाल कल्याण समिती,तत्वशिल कांबळे बाल कल्याण समिती,बालिका सिंधीकुंमठे शिक्षिका,शेख कैफ,शेख रिजवान,टिनमेकर फिरदोस हे होते,कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुरु गोविंद सिंगजी यांचे साहिबजादे बाबा फतेह सिंग आणि जोरावर सिंग या वीर बालकांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मन्सुरी यांनी

गुरु गोविंद सिंग जी यांचे साहिबजादे बाबा फतेह सिंग आणि जोरावर सिंग यांच्या हौतात्म्याचे स्मरण करण्यासाठी वीर बाल दिवस साजरा केला जातो हे भाषणातुन विद्यार्थ्यांना सांगितले. कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# शिवसेना उपजिल्हाप्रमुखपदी लोमटे तर अंबाजोगाई शहर प्रमुख पदी गणेश जाधव

## शिंदे साहेबांनी गणेश जाधव या सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी दिली: सचिन मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संसदरत्न खा.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने, शिवसेना उपनेते अर्जुन खोतकर यांच्या संमतीने, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या विनंतीवरून शिवसेना सचिव संजय मोरे साहेब यांनी शिवसेनेच्या अंबाजोगाई/ केज उपजिल्हाप्रमुखपदी राजाभाऊ लोमटे यांची तर अंबाजोगाई शहर प्रमुखपदी गणेश जाधव तसेच जिल्हा सहसंघटकपदी गजानन मुडेगावकर यांची निवड करण्यात आली आहे. निवडीनंतर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले आहे. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक



म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शहर प्रमुख पदी जाधव यांची निवड करून सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी दिली आहे. नूतन पदाधिकारी यांच्या माध्यमातून केज, अंबाजोगाई विधानसभा क्षेत्रात शिवसेना पक्षीय संघटन वाढवून विस्तारासाठी मोठा फायदा होणार आहे असे मुळूक म्हणाले.

केज आंबेजोगाई विधानसभा शिवसेना उपजिल्हाप्रमुखपदी राजाभाऊ लोमटे, तर या आधीचे शहर प्रमुख ऋषिकेश लोमटे यांची वैद्यकीय कक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदी नेमणूक झाल्याने त्या जागी अंबाजोगाई शहर प्रमुख पदावर गणेश जाधव यांची तर बऱ्याच दिवसांपासून रिक्त असलेल्या जिल्हा सहसंघटकपदी गजानन मुडेगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नूतन पदाधिकाऱ्यांचे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक व स्वप्नील गलधर यांनी नियुक्तीपत्र देऊन सत्कार केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित जिल्हा संघटक योगेश नवले, उपजिल्हाप्रमुख संतोष जाधव, बीड विधानसभा प्रमुख सुनील अनभुले ,आंबेजोगाई तालुकाप्रमुख अर्जुन भाऊ वाघमारे ,युवा सेना जिल्हाप्रमुख रवी बडे, गजानन कदम ,आकाश वडमारे, हनुमंत हावळे तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोळीबार ! कन्हेरवाडीचा कैलास फडला अटक

**बीड । प्रतिनिधी**



सोशल मिडीयावर रिव्हाल्वर मधून हवेत गोळीबार करणार्या परळी येथील इसमाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. सदर व्हीडीओ मधील व्यक्ती ही कैलास बाबासाहेब फड ( रा. कन्हेरवाडी, ता. परळी, ह.मु. बँक कॉलनी, परळी वै. ) असल्याची परळी शहर पोलीसांची खात्री झाल्यानंतर या प्रकरणात दोन दिवसापूर्वीच गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी याप्रकरणी कैलास फड याला अटक केली आहे. त्याच्या जवळील रिवाल्वर देखील जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

परळी येथील आरोपी कैलास बाबासाहेब फड याने त्याच्याकडील परवाना प्राप्त असलेल्या रिव्हॉल्वरमधून हवेत फायर केलेल्या घटनेबाबत माहिती घेता सदरची घटना ही सुमारे एक वर्षापुर्वीची असून त्याने त्याच्या घरासमोरील वाहनाची पुजा करतांना हवेत फायर केल्याची माहिती तपासात मिळाली आहे. परंतू आरोपी कैलास बाबासाहेब फड याने जिल्हाधिकारी यांचे शस्त्र परवान्यातील अटी शर्तीचे उल्लंघन करुन रिव्हॉल्वर मधून हवेत फायर केल्याने त्याच्याविरुद्ध पोलीस शिपाई विष्णू फड यांच्या फिर्यादीवरून दोन दिवसापूर्वीच परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयातील आरोपी कैलास बाबासाहेब फड यास दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी अटक करण्यात आली असून त्यास न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# माजलगाव एकता पत्रकार संघाचे मुकनायक पुरस्कार संपादक गणेश मोकाशे व संपादक बंडु खांडेकर यांना जाहीर

— मुकनायक पुरस्कार — | माजलगाव भूषण पुरस्कार



गणेश मोकाशे, संपादक, दै.राज्यलोकतंत्र; बंडु खांडेकर, संपादक, सा.घोंगडी; तालेब चाऊस, सामाजिक; सुनिल रुद्रवार, सहकार; अंबादास रोकडे, उद्योग; डॉ.दिनकर मस्के, आरोग्य; ॲड.टि.एन.कोल्हे, विधीज्ञ; बाळासाहेब कदम, भुमिपुत्र; अजय शिंदे, आदर्श सरपंच; नारायण थापडे, उत्कृष्ट तलाठी; हनुमंत राऊत, उत्कृष्ट ग्रामसेवक

## माजलगाव भुषण पुरस्काराने विविध मान्यवरांचा होणार सन्मान

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देण्यात येणार असुन यंदा या पुरस्काराचे ६ वे वर्षे असुन यावर्षीच्या मुकनायक पुरस्कारासाठी बीड/पुणे येथील दै राज्य लोकतंत्रचे संपादक गणेश मोकाशे व सा.घोंगडी चे संपादक बंडु खांडेकर यांना जाहिर झाला असुन माजलगाव भुषण पुरस्कार तालेब चाऊस, सुनिल रुद्रवार,डॉ. दिनकर मस्के, अंबादास रोकडे, बाळासाहेब कदम, ऑड. टी.एन.कोल्हे,सरपंच अजय शिंदे,तलाठी नारायण थापडे, ग्रामसेवक हानुमंत राऊत यांना जाहिर करण्यात आले असुन या पुरस्काराचे वितरण मुकनायक दिनाचे औचित्य साधून विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार असल्याची माहीती माजलगाव एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतिराम पाढरपोटे यांनी दिली आहे. बीड जिल्ह्याच्या व माजलगाव तालुक्याच्या मातीतील व्यक्तीस मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देऊन गेल्या पाच वर्षापासून सन्मानीत करण्यात येते.यंदा या पुरस्काराचे ६ वे वर्ष असुन यावर्षी पत्रकारीतेतील योगदानाबद्दल दै राज्य लोकतंत्रचे बीड/पुणे येथील संपादक गणेश मोकाशे व सा.घोंगडी चे संपादक बंडु खांडेकर यांना जाहीर करण्यात आला असुन, माजलगाव भुषण पुरस्कारा मध्ये माजी नगरसेवक तालेब चाऊस (सामाजिक),श्री सिद्धेश्वर अर्बन बँकेंचे चेअरमन सुनील रुद्रवार (सहकार),न्युट्री जॅग गुळ उद्योग समुहाचे अध्यक्ष अंबादास लक्ष्मणराव रोकडे सर (उद्योग),मस्के सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ.दिनकर मस्के (आरोग्य), माजलगाव तालुक्यातील कोथ्रुळ येथील भुमीपुत्र तथा लातुर येथील समर्पण बॅईज ऑन्ड गर्ल्स हॉस्टेलचे संचालक बाळासाहेब संदिपानराव कदम (भुमी पुत्र), माजलगाव येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयातील ऑड.टि.एन.कोल्हे (विधीज्ञ), मालीपारगाव ग्रामपंचायतीचे सरपंच अजय शिंदे (आदर्श सरपंच), केसापुरी तलाठी सज्जाचे तलाठी रामेश्वर नारायण थापडे (उत्कृष्ट तलाठी), देपेगाव, सांडस चिंचोली ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक हानुमंत राऊत (उत्कृष्ट ग्रामसेवक) यांना माजलगाव भुषण पुरस्कार जाहीर झाले असुन मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्काराचे वितरण लवकरच मुकनायक दिनाचे औचित्य साधून विविध नामांकित मान्यवरांच्या उपस्थितीत भव्यदिव्य कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार असल्याची माहिती माजलगाव एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतिराम पाढरपोटे, पत्रकार वाजेद पठाण, पत्रकार राजेभाऊ पाष्टे, पत्रकार नय्युम आत्तार, पत्रकार वसंत परसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# मराठवाड्यामध्ये सोलर पॅनल दुरुस्ती व देखभाल प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना उद्योग उभारण्याची संधी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील अमृत संस्थेच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी मोफत सोलर पॅनल इंस्टॉलेशन वर आधारीत निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम छत्रपती संभाजी नगर व लातूर येथे दोन बॅच मध्ये दिनांक ०७ /०१ /२०२५ ते २४/०१/२०२५ या अठरा दिवसाच्या कालावधीमध्ये सुशिक्षित बेरोजगार युवकांना तांत्रिक व उद्योजकीय प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सध्या ऊर्जेचा तुटवडा भासत असल्यामुळे शासनाचे धोरण सोलर ऊर्जा निर्मितीला प्राधान्य देण्याचे आहे. त्यामुळे सोलर ऊर्जा निर्मितीसाठी शासनाच्या वतीने सबसिडीच्या दरामध्ये शेतकरी तसेच लाभार्थ्यांना सोलर पॅनल देण्यात येत आहेत. परंतु सदरील पॅनल इन्स्टॉलेशन, मेंटेनन्स, दुरुस्ती करणारे मनुष्यबळ मराठवाड्यामध्ये कमी प्रमाणात उपलब्ध आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार व उद्योग करण्याची संधी या प्रशिक्षणाद्वारे उपलब्ध होणार असून प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. तसेच मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे सदरील प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये सादर करण्याची अंतिम दिनांक ०१/०१/२०२५ असून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थीसाठी दिनांक २३/ १२ /२०१४ रोजी एम सी ई डी जिल्हा कार्यालय येथे नि:शुल्क एकदिवसीय परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संबंधित सर्व जिल्ह्याच्या प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग भवन या ठिकाणी संपर्क साधावा व आपला प्रवेश अर्ज सादर करावा असे आवाहन केले आहे.

